# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:9001:2000)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला,

४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. २६४७१२५५(का)/३२५०८७०६ (वै.) फॅक्स क्र :०२२-२६४७३९८०

email : secretary @ msbte.com Web : www.msbte.com


---

जा.क्र.:मरातंशिमं/का-४०/हि.प.०८/५३ दिनांक - १३-०२-०९

प्रति,

प्राचार्य

सर्व संलग्न संस्था

विषय- हिवाळी परीक्षा - २००८ या वार्षिक/सत्र पध्दतीच्या अभ्यासक्रमांचा निकाल जाहीर करणेबाबत

आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने घेतलेल्या वार्षिक पध्दतीच्या /सत्र पध्दतीच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निकाल दिनांक १४.०२.२००९ रोजी दुपारी ३.०० वा. मंडळाच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात येत आहे.

या अभ्यासक्रमांचे निकालपत्र व गुणपत्रिका दिनांक १८.०२.२००९ रोजी विभागीय कार्यालयात उपलब्ध होतील. संस्थांनी आपल्या संस्थेची निकालपत्रके आणि गुणपत्रिका विभागीय कार्यालयाकडून स्वीकारल्यानंतर त्याची आवश्यक ती पडताळणी - छाननी करावयाची असून त्यानंतरच विद्यार्थ्यांना गुणपत्रिका दिनांक २०.०२.२००९ रोजी संस्थेमध्ये वितरीत करावयाच्या आहेत.

(प्र. अं. नाईक)

सचिव

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:9001:2000)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला,
४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. २६४७१२५५(का)/३२५०८७०६ (वै.) फॅक्स क्र :०२२-२६४७३९८०
email : secretary @ msbte.com Web : www.msbte.com


---

जा.क्र.:मरातंशिमं/का–४०/हि.प ०८/ ५४ दिनांक –१३–०२–०९

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या
अभियांत्रिकी तंत्रनिकेतने व संस्था...........

विषय :– निकाल जाहिर केल्यानंतर निकालपत्रक व गुणपत्रिका
तपासून कार्यवाही करण्याबाबत.

महोदय,

आपल्या संस्थेची निकालपत्रके व गुणपत्रिका विभागीय कार्यालयाकडून स्वीकारल्यानंतर आवश्यक छाननी केल्यानंतरच गुणपत्रिका विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात याव्यात.

निकालपत्रक तथा गुणपत्रिका यांमध्ये त्रुटी असल्यास त्या बद्दल लेखीपत्र विभागीय उपसचिवांना द्यावे. निकाल जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या व गुणपत्रिकांची संख्या पडताळून पहावी. एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका मिळाली नसल्यास विभागीय कार्यालयाकडून तशा आशयाचे लेखी पत्र प्राप्त करावे व मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे ( कार्यासन क्रमांक - ४०) पाठवावे. संस्थेतील अनेक विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका अप्राप्त असतील तर प्रणाली विश्लेषक, निकाल प्रक्रिया युनिट म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, यांना दुरध्वनीवरुनदेखील तसे कळवावे.

संस्थेचे प्राप्त झालेले निकालपत्र विद्यार्थ्यांनी भरलेल्या परीक्षा अर्जाप्रमाणे तसेच संस्थेने दिलेल्या अँडिशनल सिट नंबर्स प्रमाणे आहेत ह्यांची खात्री करावी. सदरचा निकाल मंडळाने निकाल जाहिर करण्याच्या नियमांच्या अधिन राहून जाहिर करण्यांत येत आहे. मिसिंग / अँडिशनल विषयांचे निकाल स्वतंत्रपणे जाहीर करण्यांत आले आहेत.

winter2008cir 19

सत्र पध्दतीच्या गुणांबाबत खालीलप्रमाणे नियम आहेत याची संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

१. सत्र पध्दतीमध्ये ८० गुणांची सैध्दान्तिक परीक्षा (थिएरी पेपर्स) आणि २० गुणांचे टेस्टमार्क्स अशी प्रत्येक विषयाची १०० गुणांची परिक्षा असून सैध्दान्तिक परीक्षेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास किमान २८ गुण मिळणे आवश्यक आहे. विषयवार ३ गुणांचे ग्रेस मार्क्स मिळण्यासाठी सदर सैध्दान्तिक विषयात किमान २८ गुण मिळविणे आवश्यक आहे. विषयनिहाय टेस्टमार्क्स गुणांना उत्तीर्णता असा निकष असणार नाही.

२. मात्र आर इ- १५ बी प्रमाणे विद्यार्थ्यास एकूण गुण किमान ५० टक्के असल्यास कंडोनेशनचा लाभ एका विषयशीर्षामध्ये अधिकतम १० गुण किंवा दोन विषयशीर्षांमध्ये विभागणी करुन अधिकतम १० गुणांच्या मर्यादेतच अनुज्ञेय आहेत. जास्तीत जास्त १० गुण दिल्यांनतर विद्यार्थ्यास सैध्दान्तिक विषयामध्ये किमान २८ गुण व एकूण किमान ४० गुण (उत्तीर्णतेचा निकष ४० टक्के असल्यास) तथा ३६ गुण व एकूण ५० गुण (उत्तीर्णतेचा निकष ५० टक्के असल्यास)(ॲडव्हान्स डिप्लोमा कोर्सेस तसेच पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा कोर्सेस) मिळणे आवश्यक आहे. कंडोनेशन दिल्यानंतरही विद्यार्थ्यास २८ गुण मिळत नसतील तर त्यास कंडोनेशचा लाभ अनुज्ञेय नाही. उदा. सैध्दान्तिक विषयात १७ गुण व टेस्टमार्क्समध्ये १८ गुण एकूण गुण ३५ असतील अशा प्रकरणी कंडोनेशन सुविधेचे १० गुण दिल्यानंतरही सैध्दान्तिक विषयामध्ये २८ गुण होत नसल्याने या प्रकरणी कंडोनेशन अनुज्ञेय नाही. कंडोनेशन दिल्यानंतर विद्यार्थ्याचा निकाल त्या सत्रासाठी किमान उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रत्येक सत्रासाठी कंडोनेशन स्वतंत्रपणे देण्यात आलेले आहे मात्र त्या करीता प्रत्येक सत्राचे एकूण गुण किमान ५० टक्के असणे आवश्यक आहे. (अशा प्रकरणी दोन सत्रांच्या एकत्रित गुणांची बेरीज ५० टक्केपेक्षा कमी असू शकते. मात्र ज्या सत्रांत ५० टक्केपेक्षा अधिक गुण आहेत त्या सत्रांतच कंडोनेशन अनुज्ञेय आहे. उदा. प्रथम सत्रात एकूण ४७ टक्के गुण आहेत व व्दितीय सत्रांत (स्वतंत्र) ५१ टक्के गुण आहेत या प्रकरणी एकत्रित निकालाची टक्केवारी ४९ टक्के येईल मात्र तरीही व्दितीय सत्रास कंडोनेशन अनुज्ञेय राहील.) ज्या सत्रांत विद्यार्थ्यास विषयात इ एक्स (एक्झम्पशन) आहे, त्या सत्रांत कंडोनेशन अनुज्ञेय नाही.

३. व्दितीय सत्राचा तसेच चतुर्थ सत्राचा निकाल जाहीर करताना नियम आर जी - २ (सी) नुसार एकत्रित निकाल जाहीर करण्यात आलेला आहे. अे. टी. के टी. करीता आर जी - २ (डी) नुसार नियम लावण्यात आलेला आहे. अर्थात ज्या विषयांत विद्यार्थ्यास उत्तीर्ण होणे आवश्यक आहे त्या एकूण विषयांच्या किमान २/३ (दोन तृतीयांश) विषयांत तो उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सत्र पध्दतीचा निकाल दोन सत्रे मिळून संयुक्तरित्या (प्रथम व व्दितीय सत्र, तृतीय व चतुर्थ सत्र तथा पाचवे व सहावे सत्र) जाहीर करण्याचे यापूर्वीच नियमांमध्ये नमुद करण्यात आलेले असून पाचव्या व सहाव्या सत्रांचा एकत्रित निकाल प्रथमतः उन्हाळी परीक्षा -२००९ मध्ये जाहीर होणार आहे याची आपणांस माहिती असणे अपेक्षित आहे.

वर्ष पध्दतीचे निकाल मंडळाच्या नियमावलीप्रमाणे (रेग्यूलेशन फॉर इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी - वर्ष पध्दती - नियमावली आर इ - १ ते आर इ ७) जाहीर करण्यात येत असून ते निकालही काळजीपूर्वक तपासून घ्यावेत आणि अचूकतेच्या खात्रीनंतरच विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वितरीत करण्यात याव्यात.

संस्थेमध्ये प्राप्त झालेले निकालपत्रक अभ्यासक्रमाचे टिचींग स्कीमनुसार व मंडळाचे निकाल जाहीर करण्याचे नियमांना आणि उपरोक्त नमुद केलेल्या सत्र पध्दतीच्या नियमांना अनुलक्षून बारकाईने तपासून पहावे. विशेषतः ATKT ची प्रकरणे मंडळाच्या नियमांप्रमाणे (सत्र पध्दती ) तपासावीत तसेच निकालाशी निगडीत इतर बाबीदेखील तपासाव्यात. * डीसअलाऊड विद्यार्थ्यांचे नावासमोर DIS असे छापून येणे

आवश्यक असून विद्यार्थी  अपवादात्मक परिस्थितीत परीक्षेस बसला असेल तरीही ते गुण संस्थेच्या निकालपत्रकावर छापून आले असल्यास त्यावर तात्काळ खाकी रंगाची अपारदर्शक चिकटपट्टी लावण्यात यावी.

*** उदाहरणादाखल –**

(१) अंतिम वर्ष / सत्राचा निकाल जाहीर करण्यापूर्वीच्या सर्व अटींना विद्यार्थी पात्र असणे.

(२) वेळोवेळी झालेल्या अभ्यासक्रम सुधारणेनुसार सर्व आवश्यक विषयात उत्तीर्ण होणे तसेच मिसींग व अँडीशनल विषयात उत्तीर्ण असणे.

(३) विद्यार्थी DISALLOWED किंवा CPS प्रकरणामध्ये अपात्र नसणे

(४) ज्या विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे गुणपत्रिकेत EX दर्शविले आहे, परंतु मंडळाकडून विषयात सुट मंजूर झाल्याचे आदेश प्राप्त झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे निकाल रोखुन ठेवावेत व त्यांना गुणपत्रिका देण्यांत येऊ नयेत. मंडळाकडून त्यांच्या विषयातील सुट मंजूर झाल्यानंतरच त्यांचा निकाल जाहीर करण्यांत यावा याची नोंद घ्यावी.

(५) नियम **RE -5, RE -8** व नियम **RE-18** प्रमाणे अनुक्रमे श्रेणीवाढ तथा फेर परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्याचे गुण त्यांनी दिलेल्या विषयाप्रमाणे आहेत. अथवा मागील परीक्षेचे गुण # लावून आलेले आहेत यांची खात्री करावी तद्नंतरच विद्यार्थ्यास गुणपत्रिका द्यावी. विषय अथवा गुणात त्रुटी असल्यास विद्यार्थ्यास निकाल देण्यात येऊ नये.

(६) ह्या व्यतिरिक्त इतर कांही त्रुटी आढळल्यास अशा विद्यार्थ्यांचे निकाल संस्थेने जाहीर करु नयेत. ज्या विद्यार्थ्याचा पूर्व इतिहास चुकीचा कळविण्यांत आला आहे, अगर विहित मुदतीनंतर कळविण्यांत आला आहे. अगर ज्यांचेबाबत अद्याप काही चौकशी सुरु आहे, अशा विद्यार्थ्याचे निकाल **"+ RHR "** असे जाहीर करण्यांत येत आहेत. हे निकाल **FORCED RHR** आहेत यांची संस्थांनी नोंद घ्यावी व असे निकाल जाहिर होण्याकरिता परिपूर्ण माहिती विहित मुदतीत सादर करावी.  त्याचप्रमाणे संस्थेने माहिती न दिल्याने वा ती योग्य नसल्याने मागील परीक्षांचा निकाल (हिवाळी परीक्षा- २००७ किंवा उन्हाळी परीक्षा- २००८) आर एच आर असेल तर अशाही विद्यार्थ्यांचा निकाल आर एच आर च ठेवण्यात आलेला आहे.  विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर राहणार नाहीत याबाबत प्रत्येक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर दक्षता घेणे आवश्यक आहे.

अंतिम वर्षाच्या / सत्राच्या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्याच्याबाबत त्यांची मागील वर्षाची / सत्राची " प्रिव्हीयस हिस्ट्री " तपासण्यांत आली आहे त्याप्रमाणे **WFLY / WFLS** अगर **PLY / LSP** असा अभिप्राय नोंदला आहे.  **अंतिम वर्षाच्या / सत्राच्या विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज सादर करतांना विद्यार्थी परीक्षा पूर्व पात्रता धारण करीत असल्याचे संस्थेच्या प्राचार्यांनी प्रमाणित केले असल्याने, त्यांच्या मागील वर्षाच्या / सत्राच्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा पूर्व इतिहास तपासलेला नाही याची आपण नोंद घ्यावी. जर विद्यार्थी परीक्षा पूर्व पात्रता धारण करीत नसल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेने विद्यार्थ्यास निकाल देऊ नये व मंडळास तात्काळ लेखी कळवावे. अन्यथा नियम R.G. - 4 (F) प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.**

अंतिम वर्ष निकाल दुरूस्तीसाठी (उदा-**WFLY, RHR, PLY** व **NAME C0RRECTION**) मंडळाच्या **मुंबई** कार्यालयात संस्थेच्या माहितगार प्रतिनिधीस आवश्यक त्या कागदपत्रासह तक्त्यात माहिती भरुन पाठवावे. ज्या विद्यार्थ्याचा निकाल ह्यापूर्वी **WFLY** आहे व आताचा खालील वर्षाचा निकाल **RHR** आहे अशा विद्यार्थ्यांची प्रकरणे सुध्दा अंतिम वर्ष- निकाल दुरूस्ती ह्या सदरात समाविष्ट होतील.

वरील वर्षाच्या / अंतिम वर्षाच्या नावात दुरूस्ती करावयाची असल्यास खालील वर्षाचे (प्रथम/द्वितीय) निकालात नाव बरोबर आहे किंवा नाही ह्याबद्दल विस्तृत माहिती ( उदा.–परीक्षेचे वर्ष, आसन क्रमांक इत्यादी ) पाठवावी. नावात दुरूस्तीसाठी विहित पध्दतीनुसार मेरिट लिस्ट / दहावीच्या गुणपत्रिकेची /प्रमाणपत्राची / लिव्हींग सर्टिफिकेट इत्यादीची प्रमाणित प्रत पाठवावी. ) अंतिम सत्रा/वर्षापूर्वीच्या सत्रांतील/वर्षातील परीक्षेच्या गुणपत्रिकांमध्ये/प्रमाणपत्रांमध्ये नावांत बदल करावयाचा असल्यासही आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. ज्या विद्यार्थ्यांच्या नावांत बदल अपेक्षित आहे त्यांना गुणपत्रिका/प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवू नये.

ब-याचशा संस्था निकाल जाहीर झाल्यानंतर **SW, OR, TW, TM** इत्यादी विषयांचे चुकीचे गुण परीक्षकांच्या गुणपत्रिकेत भरून पाठविण्यांत आल्याचे कळवितात. अशी प्रकरणे संस्था विभागीय कार्यालयांत सादर करत असल्याचे आढळून आलेले आहे. परंतु सादर केलेली कागदपत्रे अपूरी असतात. ह्यामुळे प्रकरणांचा निपटारा करणे अडचणीचे होते. **अशा प्रकारची प्रकरणे आपण मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे संस्था प्रतिनीधीमार्फत पाठवावीत.** संस्था प्रमुखांनी ह्याबाबत मंडळाच्या मुख्य कार्यालयांत सचिव / उपसचिव, निकाल विभाग ( **EXT - 439** ) ह्यांच्याशी दूरध्वनीवरून प्रथम संपर्क साधावा. आवश्यक त्या सर्व **मूळ कागदपत्रांसह** संस्था प्रतिनीधीस मंडळाच्या मुख्य कार्यालयात उपस्थित रहावे लागेल. सतत मुल्यांकनाची (कंटीन्यूअस असेसमेंट) गुणांची प्रपत्रे संस्थेत उघडली गेली असतील, त्यांत खाडाखोड असेल व संबंधितांची सही नसेल इरेझर इंकचा उपयोग केला असेल तर अशी प्रपत्रे मंडळ स्वीकारणार नाही. ती सादर करु नयेत. तसेच या प्रकरणी संस्थेवर दंडात्मक कार्यवाही होण्याची शक्यता आहे, ह्याची नोंद घ्यावी.

**टिप-** ज्या विद्यार्थ्याची निकालात दुरुस्ती **WFLY, PLY, RHR** व नावात दुरुस्ती करावयाची आहे ह्याची माहिती Table-D-40/A, D-40/B, D-40/C, D-40/D मध्येच भरुन पाठवावी. हे तक्ते विभागीय कार्यालयाकडून प्राप्त करावेत. निकाल दुरुस्तीच्या कार्यक्रमासाठी सोबत जोडलेले प्रपत्र- अ पहावे.

या परीक्षेच्या निकालात **WFLY** असणा–या विद्यार्थ्याचे गुण छापण्यांत आलेले आहेत. सदरचे गुण फक्त माहितीसाठी असुन या गुणांवरुन विद्यार्थ्यास कोणतीही गुणपत्रिका किंवा (कोणत्याच प्रकारचे) प्रमाणपत्र देण्यांत येऊ नये. असे प्रमाणपत्र अथवा गुणपत्रिका दिलेली आढळल्यास संस्थावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची विशेष नोंद घ्यावी. निकालपत्रात विद्यार्थ्यांचे विषयवार गुणानंतर विद्यार्थ्यांचे मागील परीक्षेचा आसन क्रमांक, नोंदणी क्रमांक छापण्यांत आलेला आहे. या आसन क्रमांकाप्रमाणे विद्यार्थ्याचे मागील परीक्षेमधील गुण पुढे घेण्यांत आलेले आहेत. हा क्रमांक आपण तपासून योग्य असल्याची शहानिशा करावी. ह्या आसन क्रमांकामध्ये विसंगती / त्रुटी असल्यास लेखी स्वरुपात मंडळाच्या त्वरीत निर्देशनास आणून द्यावे अन्यथा सदरचा आसन क्रमांक व त्यावरुन घेतलेले गुण योग्य आहेत असे समजण्यांत येईल. तसेच श्रेणीवाढ परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्याचे आसन क्रमांकाखाली " **I** " असा शब्द छापण्यांत आला आहे तसेच रिॲपिंअरींगसाठी " **R** " असा शब्द छापण्यात आला आहे याची नोंद घ्यावी व त्यात काही त्रुटी असल्यास मंडळास लेखी कळवावे. निकाल जाहीर करताना परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिकेत आढळलेल्या त्रुटींचा विचार करण्यांत आलेला आहे व विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे.

**उन्हाळी परीक्षा-०७ या परीक्षेपासून मंडळाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिमं/का-५०/२००७/डीक्यू/**

**४९ दि. २० मार्च २००७ अन्वये कॉम्प्यूटर इंजिनिअरींग/कॉम्प्यूटर टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांचे द्वितीय आणि तृतीय वर्ष वगळता अन्य अभ्यासक्रमांचे O, N, R, S मास्टर्सचे निकाल A मास्टरमध्ये जाहीर करण्यात आले आहेत. जे विद्यार्थी उन्हाळी २००७ परीक्षेपूर्वीच या मास्टर्समधील काही विषयांमध्ये उत्तीर्ण झालेले आहेत, त्यांचे गुण समकक्ष विषयांमध्ये दर्शविण्यात आलेले आहेत. त्या गुणांत कोणतीही तफावत आढळल्यास अशी गुणपत्रिका विद्यार्थ्यास देऊ नये व मंडळास तात्काळ कळविण्यात यावे. या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका अत्यंत काळजीपूर्वक तपासून निकाल अचूक जाहीर झाले आहेत याची खात्री प्राचार्यांनी स्वतः करुन घ्यावी आणि त्यानंतरच गुणपत्रिकांचे वितरण करावे.**

**सर्वसाधारण गुणपडताळणीसाठी कार्यपध्दती –**

मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील नियम आर.जी.९-जे नुसार सर्वसाधारण गुणपडताळणीची संधी (वर्ष व सत्र पध्दती दोन्ही पध्दतींसाठी ) विद्यार्थ्यांना देण्यात येत असून सर्वसाधारण गुणपडताळणीच्या कार्यक्रमासाठी सोबत जोडलेले प्रपत्र- ब पहावे. या मुदतीचा अंतिम टप्पा सुट्टीचा दिवस आल्यास पुढील कामकाजाचा दिवस हा टप्प्यासाठी अंतिम दिवस धरण्यांत यावा. ज्या विद्यार्थ्याचे निकाल **RHR, WFLY, WFLS** असे लागलेले असतील अथवा नाव व गुण छापले गेले नसतील अशा विद्यार्थ्यांना ह्या परीक्षेतील गुणांची गुणपडताळणी करावयाची असल्यास अशा विद्यार्थ्याचे अर्ज स्विकारता येतील. अशा प्रकारचा निकाल असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनीसुध्दा इतर विद्यार्थ्यासोबतच गुणपडताळणीचे अर्ज भरणे आवश्यक आहे. विलंबाने आलेले अर्ज कोणत्याही कारणास्तव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी व तशी जाणीव संस्थास्तरावरुन विद्यार्थ्यांना करुन देण्यात यावी. विलंबाने प्राप्त झालेले अर्ज प्राचार्यांनी शिफारस करुन मंडळाकडे पाठवू नयेत. सदरहू वेळापत्रक व कार्यक्रम विद्यार्थ्याच्या सूचना फलकावर लावण्यांत यावा. उपरोक्त निर्देशांचे पालन करुन आपण केलेल्या कार्यवाहीचा तपशीलवार अहवाल मंडळाला उलट टपाली सादर करावा.

**उन्हाळी २००९ परीक्षेचे परीक्षा अर्ज -**

उन्हाळी परीक्षा- २००९ चे परीक्षा अर्ज ऑन लाईन भरुन घेण्याबाबतची प्रक्रिया मंडळाकडून राबविण्यात येत असून त्याप्रमाणेच विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्यात यावेत. ज्या विद्यार्थ्यांचे निकाल आर एच आर/प्लाय/डब्ल्यू एफ एल वाय/पी एल एस/डब्ल्यू एफ एल एस अशा प्रकारच्या सदरांत आलेले आहेत त्यांची पूर्व माहिती संस्थेतच आहे, ती पडताळून घेऊन विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असल्यास त्यांचेकडून विहित मुदतीत पुढील परिक्षेकरीता अर्ज भरुन घ्यावेत. उपरोक्त बाबींत विद्यार्थ्यांचा निकाल विलंबाने लागला म्हणून परीक्षा अर्ज स्वीकारण्याची मुदत वाढवून मिळत नाही याची कृपया नोंद घ्यावी व याबाबतची स्पष्ट सूचना विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

निकाल दुरुस्तीसाठी येणा-या प्रतिनिधीस मंडळातर्फे द्वितीय श्रेणीचे रेल्वे अथवा बसचे भाडे देण्यांत येईल. विहित पध्दतीनुसार विभागीय कार्यालयाकडे देयके सादर करण्यांत यावीत.

आपला,

(प्र. अं. नाईक)
सचिव
म. रा. तं. शि. मं मुंबई– ५१

प्रत –

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई – ४०० ०५१ यांना सादर.

२) उपसचिव, म रा तं शि मंडळ, वि का, पुणे / औरंगाबाद / नागपूर व प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग, यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

३) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातील अधिकारी व कार्यासने यांना माहितीसाठी रवाना.

४) पोर्टल व्यवस्थापक - संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

५) स्थळप्रत

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक – डी–४०/गुणपडताळणी/५४

दिनांक – १३–०२–०९

## हिवाळी परिक्षा - २००८

## सर्व साधारण गुणपडताळणी कार्यक्रम

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | विद्यार्थ्यांनी संस्थेत अर्ज सादर करण्याचा कालावधी | १६.०२.२००९ ते २४.०२.२००९ |
| ०२ | संस्थेने विभागीय कार्यालयाकडे अर्ज आणून देण्याचा व विभागीय कार्यालयात संगणकावर करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी | २५.०२.२००९ ते २६.०२.२००९ |
| ०३ | गुणपडताळणीच्या याद्या विभागीय कार्यालयाने इ-मेलव्दारे मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविण्याचा दिनांक | २७.०२.२००९ ते २८.०२.२००९ |
| ०४ | मुख्य कार्यालयाने सर्व गुणमुल्यांकन केंद्रांना इ- मेलव्दारे गुणपडताळणी यादी पाठविण्याचा दिनांक | ०२.०३.२००९ ते ०३.०३.२००९ |
| ०५ | गुणमुल्यांकन केंद्राने गुणपडताळणीचे काम करावयाचा कालावधी | ०४.०३.२००९ ते ०५.०३.२००९ |
| ०६ | गुण-बदल झालेली प्रकरणे उत्तरपत्रिकांसहीत विभागीय कार्यालयात पाठविण्याचा दिनांक | ०६.०३.२००९ ते ०७.०३.२००९ |
| ०७ | विभागीय कार्यालयात त्रि-सदस्यीय समितीने करावयाची कार्यवाही | ०९.०३.२००९ ते १२.०३.२००९ |
| ०८ | गुणपडताळणीच्या प्रकरणांचे आदेश (यादी) इ-मेल व्दारे मुंबई कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | १३.०३.२००९ |
| ०९ | निकाल दुरुस्तीच्या प्रक्रियेचा कालावधी | १६.०३.२००९ ते १९.०३.२००९ |
| १० | मुख्य कार्यालयाकडून निकालदुरुस्तीच्या गुणपत्रिका विभागीय कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी | २०.०३.२००९ ते २१.०३.२००९ |
| ११ | तंत्र शिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडून गुणपत्रिका संस्थेस वितरीत करण्याचा कालावधी | २३.०३.२००९ ते २४.०३.२००९ |

टिप :- संस्थांनी विद्यार्थ्यास या तक्त्यातील अनुक्रमांक – १ मधील तारखा व कार्यक्रमाबद्दल सूचनाफलकावर लावून विद्यार्थ्याच्या निर्दशनास आणावे. उपरोक्त वेळापत्रकामध्ये सुट्टीच्या दिवशीही हेतूतः ॲक्टीव्हीटीज् दर्शविलेल्या आहेत व त्या त्याप्रमाणेंच पूर्ण करावयाच्या आहेत.

(प्र. अं. नाईक)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

तक्ता क्रमांक - मरातंशिमं/डी-४०/निकालदुरुस्ती/५४

दिनांक - १३-०२-०९

## हिवाळी परिक्षा - २००८

## RHR/WFLY

## निकाल दुरुस्तीचा कार्यक्रम

अंतिम वर्ष WFLY प्रकरणे, अंतिम वर्ष RHR प्रकरणे, अंतिम वर्ष WFLY परंतु खालील वर्षाचा (उदा.-द्वितीय वर्ष) निकाल RHR असलेली प्रकरणे, तक्त्यात भरुन मंडळाच्या मुंबई कार्यालयाकडे माहितीसह खा्लीलप्रमाणे दिनांकाप्रमाणे पाठविण्यात यावीत.

**निकाल दुरुस्तीचा प्रथम टप्पा** **२४.०२.२००९ ते ०४.०३.२००९**

| विभाग | संस्था क्रमांक |
|---|---|
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक ००१ ते ०५० मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ००६ ते ०४९ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक ०२१ ते १०० मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ०१६ ते ०६० मधील संस्था |

**निकाल दुरुस्तीचा दुसरा टप्पा** **०५.०३.२००९ ते १३.०३.२००९**

| विभाग | संस्था क्रमांक |
|---|---|
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक ०५५ ते १९३ मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक ०५१ ते १५१ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक १०२ ते १५८ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक ०६१ ते १३६ मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा तिसरा टप्पा  <u>१६.०३.२००९ ते २०.०३.२००९</u>

| विभाग | संस्था क्रमांक |
|---|---|
| १) मुंबई विभाग | संस्था क्रमांक २१५ ते ४९५ मधील संस्था |
| २) पुणे विभाग | संस्था क्रमांक २०६ ते ४९१ मधील संस्था |
| ३) नागपूर विभाग | संस्था क्रमांक २५३ ते ४९९ मधील संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | संस्था क्रमांक १९४ ते ४८० मधील संस्था |

## निकाल दुरुस्तीचा चौथा टप्पा  <u>२१.०३.२००९ ते २६.०३.२००९</u>

| विभाग | संस्था क्रमांक |
|---|---|
| १) मुंबई विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| २) पुणे विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| ३) नागपूर विभाग | उर्वरीत सर्व संस्था |
| ४) औरंगाबाद विभाग | उर्वरीत सर्व संस्था |



(प्र. अं. नाईक)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई